मंथन

# सेंद्रिय शेती नावाचा 'धंदा'



श्रीकांत पोहनकर
अध्यक्ष : पोहनकर फाउंडेशन, पुणे.
(मो.नं. ९८२२६९८१००)



स्वत:च्या शेतात अत्यल्प खर्चात उत्तम खते व कीटकनाशके तयार करणे सहज शक्य असूनही बहुसंख्य शेतकरी त्याकडे दुर्लक्ष करतात. या वस्तुस्थितीचा सर्वात जास्त फायदा जर कुणी उचलायला सुरवात केली असेल तर तो धूर्त व्यापाऱ्यांनी. टाळी ही केव्हाही दोन हाताने वाजत असते. सेंद्रिय शेतीच्या तापत चाललेल्या तव्यावर स्वत:च्या पोळ्या भाजून घेण्याच्या संधीवर तुटून पडण्याची इच्छा असलेल्यांनी सेंद्रिय खताच्या नावावर अक्षरश: माती भरलेली पोती विकण्यास सुरवात केली आणि आश्चर्य म्हणजे शेतकरी ती पोती डोळे मिटून विकतही घेऊ लागले.

सेंद्रिय शेतीवरील एका अखिल भारतीय परिषदेचा आमंत्रित या नात्याने मी नागपूरला निघालो होतो. प्रवासात जेवण घेण्यासाठी एका गार्डन रेस्टॉरंटमध्ये शिरलो. हायवेलगत असलेल्या शेतातील त्या रेस्टॉरंटचा मालक एक संत्रा बागायतदार होता. जेवणाची ऑर्डर देऊन उत्सुकतेने आसपास नजर टाकल्यानंतर मला जवळच मातीचे काही ढीग दिसले. जेवण तयार होण्यास थोडा वेळ असल्यामुळे मी त्या ढिगांजवळ पोहोचलो तेव्हा माझ्या लक्षात आले की ती माती नसून खताच्या खड्ड्यांमधून खत काढण्याचा कार्यक्रम सुरू आहे. संत्र्याची शेती सोडून रेस्टॉरंटचा मालक बनलेल्या त्या बागायतदाराला मी माझी ओळख करून दिली. त्या परिसरात कम्पोस्टचे चार मोठे खड्डे होते व त्यातील एका खड्ड्यासाठी तर राष्ट्रीय महामार्गाला खेटून असलेली सरकारी जमीनीच फुकटात लाटली होती.

खत तयार करण्यासाठी लागणाऱ्या तुराट्या, पऱ्हाट्या, ज्वारीची धसकटं, गव्हांडा व इतर सेंद्रिय पदार्थ तुम्हाला कुठून मिळतात असं विचारताच तो म्हणाला, ''त्याची काही काळजी नाही साहेब. आसपासच्या शेतकऱ्यांकडून पाहिजे तेवढा माल अगदी फुकटात मिळतो मला!''.

तब्बल पस्तीस लाख रुपये किंमतीचे ते तथाकथित सेंद्रिय खत त्या परिसरातील शेतकऱ्यांनी आगाऊ रक्कम भरून 'बुक' केले होते हे ऐकून मला धक्काच बसला. मी



त्याला विचारलं, ''सगळा कच्चा माल तुम्हाला फुकटात देण्याऐवजी शेतकरी स्वत:च खत का तयार करत नाहीत?''

### ...सगळं आयतं मिळतं म्हणून!

तो मोठ्याने हसला आणि म्हणाला, ''अहो साहेब, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये तुमच्यासारख्यांची भाषणं ऐकून जर शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळले असते तर



आमच्यासारख्यांचा धंदा चालला असता का? मी जे काही करतो ते माझ्या आसपासच्या शेतकऱ्यांनी कमीत कमी स्वत:च्या शेतीसाठी तरी करण्यास काय हरकत आहे? पण अनेक वर्षांपासून पोती, डबे व बाटल्यांमध्ये सर्व काही अगदी आयतं मिळण्याची सवय झाल्यानंतर स्वत:च्या शेतात खत तयार करण्याचा उपद्व्याप कोण करत बसेल? सेंद्रिय शेतीने शेतकऱ्यांचं किती भलं केलं हे मला माहीत नाही पण माझ्यासारख्या 'सेंद्रिय शेतीचा धंदा' करणाऱ्यांच्या घरावर सोन्याची कौलं घातली हे मात्र अगदी प्रामाणिकपणे कबूल करावंच लागेल!''

या पृथ्वीवर माणसाने जंगल तोडून शेती करायला सुरवात केल्यापासून तर हरितक्रांतीचा उदय होईपर्यंत ज्या प्रकारची शेती केली जात होती त्या शेतीचं नाव काय होतं? त्या आणि आजच्या काळात फरक इतकाच आहे की त्या काळातील शेतीचं 'सेंद्रिय शेती' असं बारसं झालं नव्हतं! आपण कधी काळी सेंद्रिय पध्दतीने शेती करत होतो हे हरितक्रांतीच्या धुंदीत शेतकरी पूर्णत: विसरूनच गेले. सतत चाळीस वर्षे रसायनांचा प्रचंड मारा सहन केल्यानंतर सर्व शक्तिशाली अशा निसर्गाने अखेर आपला इंगा दाखवून शेतकऱ्यांना जेव्हा आत्महत्या करण्यास भाग पाडलं तेव्हा सेंद्रिय शेतीच्या नावाने धावपळ सुरु झाली. विज्ञानाच्या आधाराने सेंद्रिय शेतीचा न कंटाळता सातत्याने प्रचार करणाऱ्या अनेक महनीय व्यक्तींच्या प्रामाणिक प्रयत्नांनंतरही सेंद्रिय शेतीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बुवाबाजी व फसवेगिरी का बोकाळलेली दिसते?

### सेंद्रिय तंत्राबद्दल मनात गोंधळ...

हरितक्रांतीचा उदय झाल्यानंतर गेल्या अनेक वर्षांपासून विविध रसायनांच्या मदतीने शेती करणारे व आता त्यांच्या दुष्परिणामांची जाणीव झालेले शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळण्यास नक्कीच उत्सुक दिसत आहेत, पण सेंद्रिय शेतीच्या तज्ञांमध्ये असलेल्या परस्परविरोधी

विचारधारांमुळे ते प्रचंड प्रमाणात गोंधळलेले आहेत. सेंद्रिय शेतीसाठी गांडुळ खत वापरायचं, की वडाच्या झाडाखालची माती वापरायची की काहीही न करता गप्प बसायचं (शून्य खर्चाची शेती) हेच त्यांना कळेनासं झालं आहे. सेंद्रिय शेतीचा अहमहमिकेने प्रचार व प्रसार करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे व त्याला गोंधळात टाकणाऱ्या माहितीचा मारा त्याच्यावर होत असल्यामुळे 'यापेक्षा रासायनिक शेतीच बरी!' असं म्हणण्याची दुर्दैवी वेळ त्याच्यावर येऊ नये म्हणजे मिळवली.

काही वर्षांपूर्वी 'पोहनकर फाऊंडेशन' तर्फे विदर्भात 'कृषी विकास प्रकल्प' राबविताना जे अनुभव आले ते सेंद्रिय शेतीच्या प्रचारकांना अंतर्मुख होण्यास भाग पाडणारे आहेत. अत्यंत कमी खर्चात पिकांच्या उत्पादनात आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर टाकणारे उपाय प्रात्यक्षिकासह शेतकऱ्यांच्या दारात घेऊन गेल्यानंतर ज्या उत्साही प्रतिसादाची अपेक्षा बाळगली होती ती काही अंशीच खरी ठरली. हरितक्रांतीच्या निमित्ताने कृषी केंद्रांमधून विकत घ्याव्या लागणाऱ्यांत किंवा अनेकदा विविध सरकारी योजनांमध्ये अनुदानावर मिळणाऱ्यांत पोती, पाकिटं, डबे व बाटल्यांमधून आयत्या मिळणाऱ्या कृषी निविष्ठांची गेल्या चाळीस वर्षांपासून शेतकऱ्यांना लागलेली सवय सहजतेने सुटणे शक्य नाही.



स्वत:च्या शेतात अत्यल्प खर्चात उत्तम खते व कीटकनाशके तयार करणे सहज शक्य असूनही बहुसंख्य शेतकरी त्याकडे दुर्लक्ष करतात. या वस्तुस्थितीचा सर्वात जास्त फायदा जर कुणी उचलायला सुरवात केली असेल तर तो धूर्त व्यापाऱ्यांनी. टाळी ही केव्हाही दोन हाताने वाजत असते. सेंद्रिय शेतीच्या तापत चाललेल्या तव्यावर स्वत:च्या पोळ्या भाजून घेण्याच्या संधीवर तुटून पडण्याची इच्छा असलेल्यांनी सेंद्रिय खताच्या नावावर अक्षरश: माती भरलेली पोती विकण्यास सुरवात केली आणि आश्चर्य म्हणजे शेतकरी ती पोती डोळे मिटून विकतही घेऊ लागले!

## शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला जातो

आज 'सेंद्रिय' हे हमखास व बक्कळ पैसे कमावण्यासाठी एक चलनी नाणं झालं आहे. कोणत्याही कृषी सेवा केंद्रात गेल्यास 'सेंद्रिय' या नावाखाली काय वाट्टेल ते विकले जात आहे आणि रासायनिक शेतीपासून दूर जाण्यासाठी ती अत्यंत महागडी तथाकथित सेंद्रिय उत्पादने बहुसंख्य शेतकरी डोळे मिटून खरेदी करत आहेत. भंडारा जिल्ह्यातील एका धान (भात) उत्पादकाने एक दिवस माझ्याशी संपर्क साधून मला कळवले की त्याच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्याच्या नऊ एकरामध्ये लागवड केलेल्या पिकासाठी एका कंपनीवाल्याने तब्बल पन्नास हजार रुपयांची सेंद्रिय उत्पादने त्याच्या माथी मारली. काही दिवसांनंतर पोहनकर फाऊंडेशनचं 'मिठातून समृध्दीकडे' हे पुस्तक वाचल्यानंतर त्याच्या लक्षात आलं की ५०,००० रुपयांऐवजी त्याला ९ एकरात फक्त ३५०० रुपये खर्च आला असता. 'सेंद्रिय' या नावाने आज बाजारात चाललेल्या प्रचंड फसवणुकीच्या असंख्य उदाहरणांपैकी हे फक्त एक उदाहरण आहे. एका मोठ्या कृषी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गेलो असताना सेंद्रिय शेतमाल विकणाऱ्या अनेक दुकानदारांशी चर्चा केल्यानंतर माझ्या लक्षात आलं की ते 'सेंद्रिय' या नावाने जो शेतमाल विकत होते तो सेंद्रिय असल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याजवळ नव्हता. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' हेच खरं.

शेतकऱ्यांच्या शेतात सेंद्रिय शेतीच्या यशाची पहाट खऱ्या अर्थाने उजाडायला काही काळ लागणार आहे. शेतकऱ्यांनी नकारात्मक विचारांचा त्याग करून व प्रयोगशील वृत्तीचा शक्य तितक्या लवकर अंगिकार करून स्वत:च्या शेतीत स्वत:पुरती सेंद्रिय उत्पादने तयार केली नाहीत तर धूर्त व्यापारी सेंद्रिय शेतीचा 'धंदा' करत राहतील आणि यशस्वी शेती करण्याऐवजी शेती विकणे हाच बहुसंख्य शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय झाल्याशिवाय राहणार नाही! ■